**ठळक बातम्या**

- मुंबईसह राज्याच्या विविध भागांमध्ये संततधार कायम, जनजीवन विस्कळीत
- विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या हस्ते वितरीत
- एलएनजी पुरवठ्यावरचे आपत्कालीन निर्बंध मागे घ्यायचा सरकारचा निर्णय

**आणि**

- विख्यात पंडवानी गायिका पद्मविभूषण तीजन बाई यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

<><><><><>

राज्यात आजही मुंबईसह अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे. ठिकठिकाणी पाणी साचल्यामुळे वाहतुकीला फटका बसला आहे. अनेक ठिकाणी झाडं पडली आहेत. यामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झालं. यासह राज्यभरातल्या पावसाबद्दलची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

***(मुंबईत*** *आज सोसाट्याच्या वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे दादर, माटुंगा, शिवाजी पार्क परिसर, घाटकोपर याठिकाणी अनेक झाडं उन्मळून पडली. कुर्ल्यात झाड अंगावर पडून एकाचा मृत्यू झाला. मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरची सर्व वाहतूक एक तास थांबवण्यात आली. यामुळे विमान वाहतुकीला मोठा फटका बसला. बृहन्मुंबई क्षेत्रात गेल्या २४ तासांत जुलै महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत सुमारे ७४ टक्के पावसाची नोंद झाली आहे. क्षेत्राच्या विविध भागांत या कालावधीत २५० ते ३०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली.*

***नवी मुंबई*** *परिसरात सकाळपासून पावसाचा जोर कायम आहे. पावसाबरोबर आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे घणसोली आणि ऐरोली इथं इमारतींवरचे पत्रे उडून गेले.*

***ठाणे*** *जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं, तसंच झाडं उन्मळून पडली. ठाण्यात एका इमारतीची गॅलरी कोसळल्यानं दोन जण जखमी झाले. ठाणे शहरासह कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, डोंबिवली आणि नवी मुंबईतले अनेक सखल भाग जलमय झाले असून, अनेक रहिवासी पाण्यात अडकले आहेत.*

***रायगड*** *जिल्ह्यात नेरळ हद्दीतल्या पेब किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या चौघांपैकी एकजण दरड कोसळून जखमी झाला. खोपोली इथल्या झेनिथ धबधब्याच्या परिसरात अडकलेल्या शंभराहून अधिक पर्यटकांची सुखरूप सुटका करण्यात आली. मुंबई-गोवा महामार्गावर सुकेळ खिंडीत पाणी साचल्यानं हा महामार्ग बंद आहे. तर रोहा-भिसे-नागोठणे मार्गावर भिसे खिंडीत दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाल्यानं हा रस्ता दिवसभरासाठी बंद केला आहे.*

***रत्नागिरी*** *जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सर्व नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. खेडमधल्या जगबुडी नदीनं धोका पातळी ओलांडली तर नारिंगी नदीचं पाणीही पात्राबाहेर आलं आहे.* ***सिंधुदुर्ग*** *जिल्हयात वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. पावसामुळे जिल्ह्यातल्या सुमारे ७० गावांमधला वीज पुरवठा खंडित झाला आहे.*

***नाशिक*** *शहरासह जिल्ह्यात मध्यरात्रीपासून पावसानं उघडीप दिली.* ***अकोल्यात*** *मात्र म्हणावा तसा पाऊस झालेला नाही.* ***गडचिरोली*** *जिल्ह्यात भामरागड तालुक्यात दोन दिवस मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे लाहेरी-बिनागुंडा मार्गावरच्या गुंडेनूर नाल्याला पूर आल्यानं गुंडेनूर, पेरमलभट्टी, पुंगासूर या गावांचा संपर्क तुटला आहे.* ***पालघर, बुलढाणा, कोल्हापूर, सांगली*** *जिल्ह्यातही पाऊस झाला.)*

**<><><><><>**

विकसित भारत जी राम जी योजनेअंतर्गत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज राज्यांना २५ हजार कोटी रुपयांचा निधी दूरस्थ पद्धतीनं वितरित केला. केंद्र सरकारनं या योजनेतला आपला वाटा दिला असून राज्य सरकारांनीही आपापला वाटा वितरित करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका मोहीम, अर्थात VB-G RAM G कायदा १ जुलैपासून लागू झाला आहे. 'विकसित भारत' या संकल्पनेला अधिक गती देण्याकरता या कायद्याअंतर्गत पुढच्या ५ वर्षांमध्ये देशातल्या २ लाख ८६ हजार

ग्रामपंचायतींमध्ये साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली जाणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

पश्चिम आशियात लागू झालेल्या युद्धविरामानंतर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून 'एलएनजी' अर्थात, द्रवरुप नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत सुरू झाल्यानंतर एलएनजीच्या पुरवठ्यावरचे आपत्कालीन निर्बंध सरकारनं मागे घेतले आहेत. या वर्षीच्या मार्च महिन्यात हे निर्बंध लादले होते.

<><><><><>

मुंबई-अहमदाबादच्या बुलेट ट्रेन मार्गावर विक्रोळी ते बांद्रा-कुर्ला संकुल यादरम्यानच्या भूमिगत बोगद्याच्या कामाला आज सुरुवात झाली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज या कामाचा औपचारिक प्रारंभ होणार होता, पण खराब हवामानामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असून काम तत्काळ सुरू करायचे आदेश रेल्वे मंत्रालयानं संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत .

<><><><><>

गोशाळा हे गोशक्तीचं केंद्र झालं पाहिजे, इथे केवळ गायीचं संरक्षण संवर्धन नव्हे तर संशोधन झालं पाहिजे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रे'च्या समारोपप्रसंगी ते आज नागपुरात बोलत होते. गोशाळांमध्ये गाईपासून मिळणाऱ्या विविध उत्पादनाचा विकास आणि ब्रॅण्डिंग झालं पाहिजे असं फडणवीस पुढे म्हणाले. ही उत्पादनं विकण्यासाठी विविध ठिकाणी शासनातर्फे कमी दरात स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात येतील असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

विख्यात पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण तीजन बाई यांच्या पार्थिव देहावर आज त्यांच्या मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं आज निधन झालं होतं. त्या ७० वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक दिवसांपासून त्या आजारी होत्या आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज पहाटे सव्वा तीनच्या सुमाराला त्यांची प्राणज्योत मालवली. ताकदीचा आवाज, रंगमंचावरचा आकर्षक वावर आणि सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीतून

त्यांनी पंडवानी या छत्तीसगडच्या लोककलेला वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या अद्वितीय योगदानासाठी त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीजन बाईंच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं.

<><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबूराव तिडके यांचं आज निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आदरांजली वाहिली. विदर्भाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातलं त्यांच्या योगदानाचं मुख्यमंत्र्यांनी स्मरण केलं. त्यांच्या निधनानं आपण विदर्भाच्या सार्वजनिक जीवनातलं एक उमदं, अभ्यासू आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आशीष जैस्वाल यांच्यासह इतरांनीही तिडके यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><>

जालना जिल्ह्यात परतूर तालुक्यात रोहिणा पुलाजवळ आज सकाळी खासगी बसचा टायर फुटून बस उलटल्यामुळे तीन लहान मुलांसह एकाच कुटुंबातील ११ जण जखमी झाले. स्थानिक नागरिक, पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणांनी तात्काळ मदतकार्य करून जखमींना परतूर, मंठा आणि वाटूर इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल केलं.

<><><><>

महाराष्ट्र सेवा संघातर्फे प्रतिवर्षी आयोजित केलं जाणारं गिरिमित्र संमेलन यावर्षी ११ आणि १२ जुलै रोजी महाराष्ट्र सेवा संघाच्या मुलुंड इथल्या सभागृहात होणार आहे. यंदा या संमेलनाचं २३वं वर्ष असून 'युद्धभूमीवरील गिर्यारोहण' ही यंदाच्या संमेलनाची संकल्पना आहे. गिर्यारोहण क्षेत्रात प्रतिष्ठेचे मानले जाणारे 'गिरिमित्र पुरस्कार' या संमेलनात प्रदान करण्यात येणार आहेत. याशिवाय गिर्यारोहण विषयक माहितीपटांचं प्रदर्शन, प्रश्नमंजुषा तसेच ब्लॉग, रील्स आणि छायाचित्रण स्पर्धांमधील विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

<><><><>

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष एकेरीत आज अग्रमानांकित यानिक सिनरचा सामना शिंतारो मोचीझुकी याच्याशी होणार आहे, तर नोव्हाक जोकोविचसमोर

रोमान सॅफिउलीन याचं आव्हान असेल. महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंकाचा सामना नाओमी ओसाका बरोबर रंगणार आहे. काल महिला एकेरीच्या तिसऱ्या फेरीत एलिजे मेर्टन्स हिनं जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेली एलेना रिबाकीना हिला ७-६, ६-१ अशा थेट सेट्समध्ये पराभवाचा धक्का दिला. तर अलेक्झांड्रा इयाला हिनं तिसऱ्या क्रमांकाची टेनिसपटू इगा श्वियांतेक हिच्यावर ७-६, ६-२ अशी मात केली. पुरुष एकेरीत अलेक्झांडर झ्वेरेव्ह यानं मार्कोस गिरॉन याला ६-२, ७-६, ६-४ असं हरवून पुढच्या फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगानं राज्यातले सर्व जिल्हाधिकारी आणि बाल संरक्षण कक्षाच्या अध्यक्षांना जिल्ह्यांमधल्या बाल संरक्षण व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन १५ जुलैपर्यंत सविस्तर अहवाल सादर करायचे निर्देश दिले आहेत. हा अहवाल संबंधित विभागांकडून माहिती संकलित करून नाही, तर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पडताळणी करून वस्तुनिष्ठ स्वरूपात सादर करावा, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

येत्या २४ तासांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसासह अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><>//